**प्रश्न- भारतीय तत्वज्ञानाची वैशिष्ट्ये लिहा.**

तत्वज्ञान म्हणजे आपल्या एकूणच अनुभवांची लावलेली व्यवस्था होय. आपली विश्वाकडे पाहण्याची दृष्टी कोणती आहे, त्यातूनच तत्त्वज्ञान निर्माण होत असते. तत्वज्ञान हा मानवी जीवनाकडे पाहण्याचा एक डोळस दृष्टिकोण आहे. कोणत्याही समाजाची संस्कृती समजून घ्यावयाची असेल तर सर्वप्रथम त्या संस्कृतीमागे असणारे वैचारिक अधिष्ठान समजून घ्यावे लागते, तत्वज्ञान समजून घ्यावे लागते

आपण भारतीय समाजरचनेचे घटक आहोत. त्यासाठी आपल्याला भारतीय संस्कृतीचा परिचय असणे आवश्यक आहे. परंपरेने चालत आलेले रीतिरिवाज पाळले किंवा धार्मिक कर्मकांड पाळले अथवा पोथ्या पुराणांचा अभ्यास केला म्हणजे आपण ती संस्कृती आत्मसात केली असा त्याचा अर्थ होत नाही. त्यासाठी भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला पाहिजे. निदान त्याचा स्थूल परिचय तरी करून घेतला पाहिजे. ज्याप्रमाणे भारतीय समाजजीवनात विविधता आहे त्याच प्रमाणे भारतीय तत्त्वज्ञानही विविधतेने नटलेले आहे. असे असले तरी भारतीय समाज जीवनाच्या विविधतेत एक विशिष्ट एकता दिसून येते. तशीच एकता भारतीय तत्वज्ञानातही दिसून येते. ती एकता भहणजेच भारतीय तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये होत. ती पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**१) मोक्ष :** चार्वाक दर्शन सोडून जवळपास सर्वच दर्शनानी मोक्ष हे परमप्राप्तव्य मानले आहे. प्रत्येक दर्शनाच्या मोक्ष संकल्पनेत थोडाफार फरक असला तरी प्रत्येकात एका बाह्य गोष्टीचा आस्विकार असून स्वताच्याच एका आंतरिक स्थितीचा निर्देश केलेला आहे ती स्थिती म्हणजेच मोक्ष होय-

मोक्ष याचा अर्थ मोकळीक अथवा सुटका असा होतो. सुटका करून घ्यावयाची असेल तर सर्वप्रथम आपण कोणत्या तरी बंधनात आहोत हे मान्य करावे लागते हे बंधन कोणते? याचे उत्तर असे देता येते की, आपण जीवन जगत असताना एक सारखे इच्छांची पूर्तता करण्याचा प्रयत्न करतो. आपण जे आहे त्याविषयी समाधान न मानता जे नाही त्याविषयीची खंत आपल्या मनात असते. आपल्याला काही तरी मिळवायचे आहे अशी सतत रुखरुख आपल्याला लागलेली असते. प्राप्त असणे आणि पाहिजे असणे या दोन्हीतील अंतर आयुष्यभर भरून न येणारे असते. त्यामुळे आपल्याला सतत अपुरेपणाचा अनुभव येत असतो त्याला बंधन असे मानले जाते. हे बंधन किंवा हा अपुरेपणा दुख निर्माण करणारा असतो, त्यातून स्वतःची सुटका करून घेणे म्हणजेच मोक्ष होय. दुःखमय जीवनातून स्वतःची सुटका करून चिरंतन अविनाशी आनंदाची प्राप्ती करून घेणे म्हणजे मोक्ष होय. मानवी जीवन इच्छामय किंवा वासनामय असते. इच्छांची पूर्तता करत राहणे म्हणजेच जीवन होय. त्यासाठीच सर्व धडपड चाललेली असते. ती धडपड दुःखदायी असते. म्हणून वासनांचा क्षय करून वासनाशून्य जीवन जगणे म्हणजे मोक्ष होय. जवळपास सर्वच भारतीय दर्शनानी असे मान्य केले आहे की 'मोक्ष' ही अवस्था मृत्यूनंतर अनुभवास येणारी नसून याच जन्मी अनुभवता येऊ शकते.

**२) कर्म सिद्धांत :** चार्वाक दर्शन सोडून जवळपास सर्व दर्शनानी कर्म सिद्धांत स्वीकारला आहे. मानवी जन्ममृत्यूचे चक्र चालू आहे ते केवळ व्यक्तीच्या कर्मामुळे. एवढेच नाही तर विश्वात घडून येणाऱ्या सर्व घटना या केवळ व्यक्तींच्या कर्मामुळे घडतात. व्यक्ती जसे कर्म करेल तसे तिला फळ मिळते. चांगल्या कर्माचे फळ चांगले तर वाईट कर्माचे वाईट फळ मिळते असे प्रतिपादन करणाऱ्या मतास कर्म सिद्धांत असे म्हणतात आजच्या विज्ञानाने दृष्ट जगातील कोणत्याही घटनांचा अन्वय भौतिक कारण कार्य संबधाने लावला आहे. कोणतीही घटना एका विशिष्ट भौतिक कारणाने घडते असे विज्ञान मानते. परंतु भारतीय दर्शनानी कारणकार्य भाव भौतिक दृष्टिने न घेता त्याची मीमांसा नैतिक दृष्टिकोनातून केली आहे. जगातील प्रत्येक घटना ही प्राणीमात्रांच्या कर्मामुळे किंवा कर्माच्या बरेवाईटपणामुळे घडते असे त्यांनी मानले. एवढेच नाही तर प्रत्येक कृतीला जशी भौतिक बाजू असते तशीच नैतिक बाजूही असते. भौतिक बाजूचे जसे भौतिक परिणाम होतात तसे नैतिक बाजूंचे नैतिक परिणाम होतात असेही मानले, थोडक्यात भारतीय दर्शनांचा कारण-कार्यविषयक दृष्टीकोन म्हणजेच कर्म- सिद्धांत होय.

**३) पुनर्जन्म :** कर्मसिद्धांताला जोडून येणारा पुनर्जन्माचा सिद्धांत चार्वाक दर्शन सोडून जवळपास सर्वच दर्शनाना मान्य आहे. बौद्ध- दर्शनाने आत्मा मानला नाही तरीदेखील पुनर्जन्मावर त्यांचा विश्वास आहे. कर्म सिद्धांतानुसार व्यक्तीच्या चांगल्या कर्माचे चांगले तर वाईट कर्माचे फळ वाईटच मिळते. परंतु आपला व्यावहारिक अनुभव मात्र वेगळा असतो. बऱ्याच व्यक्ती वाईट  कर्म करत असल्या तरी त्याचे फळ मात्र चांगले व ब-याच व्यक्ती चांगले कर्म करूनही त्याचे फळ मात्र वाईट मिळल्याचे आपल्याला दिसून येते. याचे नैतिक समर्थन आपल्याला करता येत नाही. जीवनातील ही विसंगती टाळण्यासाठी किंवा त्याचे नैतिक समर्थन करण्यासाठी आपल्याला पूर्वजन्म/ पुनर्जन्म मानावा लागतो. व्यक्तीला या जन्मी दुःख का भोगावे लागते तर पूर्वजन्मी त्याने काही तरी वाईट कर्म केले असावे किंवा त्याच्या या जन्मीच्या कर्माचे फळ या जन्मात मिळाले नाही तरी पुनर्जन्मात तरी निश्चितच भोगावे लागेल असे मानावे लागते. विचारांची ही चौकट सर्वच भारतीय दर्शनाना समान आहे

**४) परस्परावलंबन :** पाश्चात्य दर्शनात अशी प्रवृत्ती दिसून येते की एखादा तत्त्वचिंतक त्याचे स्वतःचे दर्शन निर्माण करतो. त्याच्यानंतर येणारा तत्त्वचिंतक पहिल्याच्या तत्वज्ञानाचे खंडन करून परत नवीन दर्शन निर्माण करतो. तिसरा येऊन त्यात आणखी काही सुधारणा करतो. खंडन मंडनाच्या अशा प्रक्रियेतून त्यांच्या तत्त्वज्ञानाची वाढ झालेली दिसून येते. परंतु भारतात मात्र निराळा प्रकार घडत गेला. एकमेकांवर आघात प्रत्याघात करीत एकाच वेळी सर्वाची वाढ होत गेली. स्वताच्या तत्वज्ञानाएवढेच प्रतिपक्षाच्या तत्त्वज्ञानास तेवढेच महत्व दिले गेले. याचा परिणाम म्हणून चार्वाक दर्शनासारख्या बंडखोर दर्शनाचा देखील भारतीय तत्त्वज्ञानात समावेश केला गेला. कोणत्याही दर्शनाने प्रतिपक्षाचे मत विकृत स्वरुपात मांडले नाही. उलट प्रतिपक्षाची भूमिका अधिक चांगल्या त-हेने

मांडण्याचा प्रयत्न केला गेला. प्रत्येक दर्शनाचा विकास दुसऱ्या दर्शनाच्या विकासास उपकारक ठरला. म्हणजेच भारतीय दर्शनांची वाढ परस्परावलंबनाने, एकमेकांच्या सहकार्याने झाली आहे.

**५) प्रमाणचर्चा:** चार्वाक दर्शनासह सर्वच भारतीय दर्शनांनी प्रमाण चर्चा केली आहे. कोणतेही दर्शन कोणती प्रमाणे स्वीकारते त्यावरून त्याचा विश्वाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कोणता आहे हे समजून येते. सर्वच भारतीय दर्शनानी प्रमाणचर्चा केलेली असली तरी प्रमाणे कोणती स्वीकारायची यावरून त्यांच्यात मतभेद असलेले दिसतात. चार्वाक दर्शन एकच प्रमाण स्वीकारते. बौद्ध, जैन, वैशेषिक हे दोन तर सांख्य-योग दर्शन तीन प्रमाण स्वीकारतात. न्याय दर्शन चार, मीमांसा व वेदान्त दर्शन सहा प्रमाण स्वीकारतात.

**६) भोक्ता – भोग्य विभागणी :** सर्वच दर्शनांनी संपूर्ण विश्वाची विभागणी भोक्ता – भोग्य अशा स्वरुपात केलेली आहे. मानव या विश्वाचा भोक्ता आहे. त्याच्यासाठी या विश्वाची निर्मिती झाली असून विश्वातील सर्व वस्तू या भोग्य असून त्यांची निर्मिती मानवासाठीच झालेली आहे अशी धारणा सर्वच भारतीय दर्शनातून दिसून येते.

**७) सर्वंकष विचार :** कोणत्याही तत्त्वज्ञानात साधारणतः जीव, जगत आणि ईश्वर अशा तीन गोष्टींचा विचार केला जातो. पाश्चात्य तत्त्वज्ञानात प्रामुख्याने मानवाचाच विचार केला जातो. ते मानवकेंद्री तत्त्वज्ञान आहे. तुलनेने इतर दोन घटकांचा फारसा विचार केला जात नाही. परंतु भारतीय तत्त्वज्ञात जीव, जगत आणि ईश्वर अशा तिन्ही घटकांचा सर्वंकष विचार केलेला दिसून येतो. त्यात कोणत्याही एका घटकास प्राधान्य देऊन विचार न करता सर्व घटकांना सामान स्थान दिले गेले आहे.

अशा रीतीने विविधतेने नटलेल्या भारतीय तत्त्वज्ञानात वरील प्रकारची एकता दिसून येते. हीच भारतीय तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये म्हणून सांगता येतात.

***